## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची बुधवार दि. २८/०७/२००९ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची ११८ वी बैठक मंगळवार दि. २८.७.२००९ रोजी सकाळी ११.०० वा. गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृहात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. आमदार श्री. सचिन अहिर | सभापती |
| २) | मा. श्री. सुभाष हजारे, भा.प्र.से. | उप सभापती तथा मुख्य अधिकारी |
| ३) | मा.आमदार श्री.बशीर पटेल | सदस्य |
| ४) | मा. श्री. गजेंद्र लष्करी | सदस्य |
| ५) | मा. श्री. नंदकुमार काळे | सदस्य |
| ६) | मा. श्री. कमरुद्दीन मर्चंट | सदस्य |
| ७) | मा. श्री. किसन बा. जाधव | सदस्य |
| ८) | मा. श्रीमती सुरेखा पाटील | सदस्या |
| ९) | मा.श्री.सईद खान | सदस्य |
| १०) | मा.श्री.हरिष सणस | सदस्य |
| ११) | मा.श्रीमती उल्का पाटकर | सदस्य |
| १२) | मा.श्री.हेमराज शहा | सदस्य |
| १३) | मा.श्री.सुबोध बांदिवडेकर | सदस्य |
| १४) | मा.श्री.व्ही.जी.नायर | सदस्य |
| १५) | मा.श्री.शरद शिरिषकर | सदस्य |
| १६) | श्री. उत्तम क. बनसोडे,<br>सहायक कर निर्धारक व संकलक, म.न.पा. | निमंत्रक |
| १७) | श्री. चंद्रकांत क. उंडगे<br>कार्यकारी अभियंता/इमारत प्रस्ताव | निमंत्रक |
| १८) | श्री. अनिल देशमुख,<br>निवासी कार्यकारी अभियंता | सचिव |

सचिव यांनी उपस्थित मा. सभापती, मा. उपसभापती व सर्व सन्मा. सदस्यांचे स्वागत करुन मा. सभापती यांच्या परवानगीने बैठकीच्या कामकाजास सुरुवात केली.

**बाब क्रमांक : ११८/१**

विषय- दि. ३०/०६/२००९ रोजी झालेंल्या ११७ व्या बैठकिचा कार्यवृतांत स्थायी करण्याबाबत.

---

सदर कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.१ ते ११ वर सादर करण्यात आला आहे.

मा. सभापती यांनी अशी सूचना केली की, आतापर्यंत झालेल्या बैठकांमध्ये जे धोरणात्मक निर्णय घेण्यात आले आहेत त्यांच्या अंमलबजावणीबाबत आढावा घेण्यात यावा. त्याकरिता मंडळाची एक बैठक आचारसंहिता लागू होण्याआधीच घेण्यात यावी. आचारसंहिता लवकरच लागण्याची शक्यता असल्यामुळे सदर बैठक ऑगस्ट-२००९ च्या पहिल्या आठवडयात घेण्यात यावी.

मा. सदस्य श्री. लष्करी यांनी पुनर्रचित इमारतीतील गाळयांचे भाडे बँकेमार्फत वसुल करण्यात येणार होते त्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली अशी विचारणा केली असता श्री. मठपती, उपमुख्य अधिकारी (पु.गा.) यांनी माहिती दिली की, प्रायोगिक तत्वावर सारस्वत बँकेमार्फत भाडे जमा करण्यात येईल. याबाबत दि. ५ किंवा ६ ऑगस्ट-२००९ रोजी चर्चा करण्यासाठी सारस्वत बँकेचे अधिकारी मंडळाच्या कार्यालयात येणार आहेत. त्यावर मा. सदस्य श्री. लष्करी यांनी सदर उपक्रम स्तुत्य असल्याचे व जवळच्या बँकेत भाडे भरण्यासाठी कार्यवाही करता येईल का ? ते पहावे अशी सूचना केली.

मा. सभापती यांनी अशी सूचना केली की, मा. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते कुलाबा संक्रमण शिबीर येथील पुनर्विकास कामाच्या पायाभारणीचे उद्घाटन, बोरा बाजार येथे पुनर्रचित झालेल्या इमारतीतील गाळयांच्या चावी वाटपाचा कार्यक्रम तसेच पुनर्रचित झालेल्या वासुदेव विनायक चाळ, सातरस्ता, वंजारी भंडारी चाळ या पुनर्रचित इमारतीतील गाळयांच्या चावी वाटपाचा कार्यक्रम करण्याचा कार्यक्रम लवकरात लवकर आखण्यात यावा. म्हणजे त्यानुसार मा. मुख्यमंत्री महोदयांची कार्यक्रमास वेळ घेता येईल.

मा. सदस्य श्री.लष्करी यांनी सूचना केली की, ज्या ज्या संक्रमण शिबीरात मंडळाची कार्यालये आहेत त्या कार्यालयांत संक्रमण शिबीरातील गाळे कोणाला वितरीत केले त्यांची नावे व फोटो इ. माहिती जाहीरपणे लावण्यात यावी म्हणजे कोणत्या गाळयात घुसखोर आहेत याची माहिती पटकन कळू शकेल.

मा. सदस्य श्री. बांदिवडेकर यांनी असे निदर्शनास आणले की, त्यांच्या परिचयाच्या एका व्यक्तीस आवश्यक ते कागदपत्र कार्यालयात जमा केल्यानंतर संक्रमण गाळा वितरीत करण्यात आला परंतु त्या गाळयाच ताबा मागील आठ महिन्यांपासून देण्यात आलेला नाही. त्यांनी स्वतः याबाबत उपमुख्य अधिकारी (संक्रमण गाळे) यांच्याकडे पाठपुरावा केला तरीही अजून गाळयाचा ताबा देण्यात आलेला नाही. संबंधित अधिकारी असे सांगतात की, ज्या गाळयाचा ताबा द्यावयाचा आहे त्या गाळयात घुसखोर आहे तो बाहेर निघत नाही. मा. सदस्य यांनी सदर घुसखोरास काढून टाकण्यासाठी इतका कालावधी का लागतो व सदर गाळा रिक्त असल्याबाबत तपासणी अहवाल कसा येतो ? याचा संबंधित अधिका-यांनी खुलासा करावा अशी सूचना केली. यावर संबंधित अधिकारी श्री. चौधरी यांनी पोलीस स्टेशनमध्ये संबंधित घुसखोराची तक्रार करुन त्या घुसखोरास २-३ दिवसांत बाहेर काढून गाळयाचा ताबा देण्यात येईल असे आश्वासन दिले.

मा. सभापती यांनी अशी सूचना केली की, संक्रमण शिबीरात २०-२५ वर्षांपासून लोक रहात आहेत त्यांना बृहतसूचीवर घेऊन पुनर्रचित इमारतीतील गाळे वाटप करण्याची जबाबदारी मंडळाची आहे. त्यांच्यापैकी काही मुळ भाडेकरुंनी गाळे विकलेले आहेत. ज्या लोकांनी असे गाळे विकत घेतले आहेत त्यांच्याकडून काही शुल्क घेऊन त्यांचे गाळे नियमित केल्यास मंडळास महसुल मिळेल व घुसखोरी होण्यास आळा बसेल.

मा. सदस्य श्री.किसन जाधव यांनी घुसखोराची नक्की व्याख्या काय आहे अशी विचारणा करुन एका पुनर्रचित इमारतीतील गाळेधारकाकडून १९८६ पासून भाडे घेण्यात आलेले नाही असे निदर्शनास आणले. त्यांनी असेही निदर्शनास आणले की, गिरगाव विभागात तीन इमारती अशा आहेत की त्या इमारतीतील गाळेधारकांकडून भाडे वसुल करण्यात येत नाही. असे किती दिवस चालणार आहे.

मा. सभापती यांनी अशी माहिती दिली की, मंडळाच्या पुनर्रचित इमारतींमध्ये सुमारे २३६ व्यक्ती वर्षानुवर्षे असेच राहतात. त्यांच्याकडून काही दंडात्मक रक्कम घेऊन नियमित

करण्याचा प्राधिकरणाचा निर्णय झाला होता. त्या निर्णयानुसार हया व्यक्तींनी पैसे देखील भरले होते. परंतु सदर निर्णय नंतर श्री. सिताराम कुंटे हे म्हाडाचे उपाध्यक्ष पदी आल्यानंतर रद्द केला. आता त्या व्यक्तींवर अपिलेट कोर्टात केसेस् चालू आहेत.

मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, ज्या संक्रमण शिबीरांचा पुनर्विकास करण्यात येणार आहे त्या संक्रमण शिबीरांना प्राधान्य देऊन संक्रमण शिबीर निहाय कॅंप घेण्याचे प्रस्तावित आहे. पुनर्विकास करताना संक्रमण शिबीरातील मुळ रहिवाशांना कायमस्वरुपी तेथेच जागा हवी असेल तर त्यांना त्यांच्या मुळ जून्या इमारतीतील गाळयाचा हक्क सोडण्याच्या अटीवर तेथेच पुनर्वसन करण्याचे विचाराधिन आहे. व असे करीत असताना घुसखोर काढण्यास मदत होईल. परंतु भाडेकरुंचा जून्या इमारतीतील हक्क सोडण्याच्या अटीबाबत व त्या हक्का बदल्यात म्हाडाला पुनर्विकसित/पुनर्रचित इमारतीत तेवढयाच क्षेत्रफळाची जागा मिळणेबाबत कायद्यात तरतुद करावी लागेल.

मा. सदस्य श्री. लष्करी यांनी लॅमिनेट व्हेकेशन नोटीस देण्यात येणार होती त्याबाबत काय झाले अशी विचारणा केली असता श्री. चौधरी, उपमुख्य अधिकारी (संक्रमण गाळे) यांनी माहिती दिली की, लेमिनेटेड व्हेंकेशन नोटीसचा नमुना तयार करुन त्याबाबत पुढील कार्यावाही करण्यात येईल.

मा. सदस्य श्री.किसन जाधव यांनी असे निदर्शनास आणले की, डी.विभागातील एका इमारतीची दुरुस्ती करण्यात येत असून अर्धवट दुरुस्ती झाल्यानंतर घरमालकाने कंपाऊंड बंद करुन टाळे लावले. त्यामुळे दुरुस्तीचे काम अर्धवट राहिले असून सध्या ते बंद पडले आहे. याबाबत पोलीस ठाण्यात तक्रार केली असता सदर टाळे तोडण्याचे अधिकार पोलीसांना नाहीत असे त्यांना सांगण्यात आले. तरी याबाबत कायदेशीर सल्ला घेणे आवश्यक आहे. यावर मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, उच्च न्यायालयात कलम ९५-अे प्रकरण दाखल असून म्हाडाला टाळा तोडण्याचा अधिकार आहे का ? अशी न्यायालयास विचारणा करण्यात आली आहे. मा. सभापती यांनी असे मत व्यक्त केले की, काही रहिवाशी इमारत धोकादायक असूनही गाळा खाली करत नाहीत. अशा रहिवाशांना बळजबरीने काढून त्या गाळयांना टाळे मारणे आवश्यक आहे. ताडदेव येथील जर्मन चाळीच्या संदर्भात न्यायालयात कलम ९५-अे खाली प्रकरण दाखल झाले असता न्यायालयाने मंडळाची बाजू योग्य असल्याचे सांगून गाळे खाली न करणा-या रहिवाशांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. मा. सभापती यांनी म्हाडाचे विधी सल्लागार श्री. वाचासुंदर यांना बैठकीत बोलावून घेतले व सभागृहास या विषयाबाबत कायदेशीर बाजूची माहिती देण्याची सूचना केली. श्री. वाचासुंदर, विधी सल्लागार यांनी माहिती दिली की, पोलीसांनी घेतलेले आक्षेप त्यांना कळविण्यात यावेत म्हणजे त्याप्रमाणे पुढील काय कार्यवाही करावी याबाबत मार्गदर्शन करता येईल. यावर मा. सभापती यांनी असे सुचविले की, अशा प्रकरणांमध्ये एखादा चांगला वकील नेमावा लागला तरी तो नेमण्यात यावा जेणेकरुन मंडळाची बाजू योग्यरितीने न्यायालयासमोर मांडण्यात येईल नाहीतर त्यामुळे संमती नसलेल्या ३० टक्के लोकांचे फावेल व संमती असलेल्या ७० टक्के गरजू लोकांचे हाल होतील व मंडळास काम करणे मुष्किल होईल.

मा. सदस्य श्री.किसन जाधव यांनी नवीन शासन धोरणाप्रमाणे ३३(७) अंतर्गत ज्या ठिकाणी अजून काम सुरु झाले नाही तेथील रहिवाशांनी २२५ चौ.फू.चे गाळयांऐवजी ३०० चौ.फू.चे गाळे मागितले तर ते देणे बंधनकारक नाही का ? त्यावर मुख्य अधिकारी यांनी असे सांगितले की, शासनाच्या धोरणानुसार ते बंधनकारक नाही. ३०० चौ.फू. क्षेत्रफळाच्या सदनिका करताना [illegible] च.क्षे.नि. वाढविलेला नाही. म्हाडाकडून २.५ च.क्षे.नि ऐवजी ३.०० च.क्षे.नि. देण्याबाबत प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे.

मा. सदस्य श्री.किसन जाधव यांनी मंडळासमोर सादर करण्यात आलेल्या रु.२००० प्रति चौ.मी. प्रस्तावांमध्ये लावलेल्या तक्त्यांमध्ये नमुना एकसारखा नसल्याबद्दल सुचविले. त्यावर सदर प्रस्ताव यापुढे एकसारख्या फॉर्मेटमध्ये सादर करण्यात येईल असे सचिव यांनी सांगितले.

चर्चेअंती कार्यवृत्तांत सर्वानुमते स्थायी करण्यात आले.

------------------------------------------oo-----------------------------------------

**<u>बाब क्रमांक ११८/२</u>**

विषय- मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातील दुरुस्ती व पुनर्रचना विभागाचे एकत्रिकरण करण्याबाबतचा प्रस्ताव..

--------------------------------------------------------------------

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.१३ ते २१ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

मुख्य अधिकारी /दु.व पु. यांनी मा.सभापती व सर्व मा. सदस्यांना एकत्रिकरणाच्या प्रस्तावाची माहिती दिली. मुंबई इमारत पुनर्रचना विभागामध्ये सद्यस्थितीत एक उपमुख्य अभियंता व तीन कार्यकारी अभियंता कार्यरत असून मुंबई इमारत दुरुस्ती विभागामध्ये दोन उपमुख्य अभियंता व नऊ कार्यकारी अभियंता कार्यरत आहेत. मागील काही महिन्यामधील शासनाने विकास नियंत्रण नियमावलीत कलम ३३ (७) व ३३ (९) मध्ये सुधारणा केलया असून त्या सुधारणा पाहता विकास नियंत्रण नियमावलीत कलम ३३ (९) अन्वये समुह पुनर्विकास (क्लस्टर डेव्हलपमेट ) करण्याची तरतुद केलेली आहे. त्या अनुषंगाने उपकरप्राप्त व बिगर उपकरप्राप्त अशा दोन्ही इमारतीमधील भाडेकरु/रहिवाशांची यादी दुरुस्ती विभागातर्फे प्रमाणित करावयाची असल्यामुळे दुरुस्ती विभागामधील कामामध्ये वाढ होणार आहे तसेच शासनाने विकास नियंत्रण नियमावलीत कलम ३३ (७) व ३३ (९) मध्ये सुधारणा करुन जून्या मोडकळीस आलेल्या इमारतीतील रहिवाशांना /भाडेकरुंना किमान ३०० चौ.फू.ची सदनिका देण्याची तरतुद केल्याने पुनर्विकासाच्या कामास गती मिळणार आहे व विकास नियंत्रण नियमावलीत कलम ३३ (७) खाली म्हाडा संपादित जमिनीचा तसेच पुनर्रचित इमारतींचा खाजगी विकासकामार्फत संयुक्त पुनर्विकास करण्याचे धोरण प्रस्तावित असून त्यास लवकरच मंजूरी मिळण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे पुनर्रचना विभागाचे काम फारच कमी होणार आहे. वरील बाबी विचारात घेता व भविष्यात होणारी कामाची वाढ विचारात घेऊन कुठल्याही प्रकारचा आर्थिक बोजा न वाढवता दुरुस्ती व पुनर्रचना हे विभाग एकत्रित करुन १२ विभाग करावयाचे व त्या त्या विभागातील दुरुस्तीची तसेच पुनर्रचनेची/पुनर्विकासाची कामे त्या त्या कार्यकारी अभियंत्यांनी करावे असा प्रस्ताव आहे. त्यामुळे त्या त्या विभागातील संपूर्ण कामे जसे इमारतीची दुरुस्ती, भूसंपादन, पुनर्बांधणी, पुनर्विकास इ. त्याच विभागात होतील. त्यामुळे इमारत दुरुस्ती व पुनर्रचना विभागाची तीन विभागांमध्ये विभागणी होईल. १) दक्षिण परिमंडळ, २) मध्य परिमंडळ, ३) उत्तर परिमंडळ. व प्रत्येक परिमंडळात एक उप अभियंता व ४ कार्यकारी अभियंता इमारत व पुनर्रचनेसाठी उपलब्ध होतील. त्यामुळे कामाचे सुसूत्रिकरण होऊन कामे जलद गतीने होतील. तरी सदर एकत्रिकरणाचा प्रस्ताव हा महत्वाचा व धोरणात्मक बाब असल्यामुळे मंडळासमोर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे व याबाबत काही सूचना असतील तर त्या मा. सदस्यांनी कराव्यात अशी विनंती करण्यात आली.

मा. सदस्य श्री.सुबोध बांदिवडेकर यांनी अशी सूचना केली की, सदर प्रस्ताव स्वागर्ताह आहे मात्र फ/दक्षिण व ग/दक्षिण या दोन विभागातील उपकरप्राप्त इमारतींची संख्या इतर

विभागाच्या तुलनेने कमी असल्यामुळे तेथील कामाचा व्याप कमी झाल्याचे नमूद केले. तसेच सद्यस्थितीत एक कार्यकारी अभियंता व ४ उप अभियंता हे या विभागात कार्यरत आहेत. प्रस्तावित प्रस्तावामध्ये एक कार्यकारी अभियंता व दोन उप अभियंता यांची संख्या वाढणार आहे. आधिच दुरुस्ती मंडळामध्ये कर्मचारी/अधिका-यांची संख्या कमी आहे. तरी फग/दक्षिण विभागाची प्रस्तावित केलेली दोन विभागातील फेररचना योग्य वाटत नाही. त्याऐवजी पूर्वीप्रमाणेच फद व गद हे दोन वॉर्ड न करता एकच वॉर्ड म्हणून ठेवावा अशी सूचना केली.

यावर मुख्य अधिकारी यांनी असे निदर्शनास आणले की, या बाबीचा विचार करण्यात आला असून मुळातच ३३ (९) खालील प्रस्ताव या विभागातून जास्त येण्याची शक्यता आहे. व ३३ (९) मध्ये बिगर उपकरप्राप्त इमारतींचाही समावेश असल्यामुळे फक्त उपकरप्राप्त इमारतींचा विचार करणे योग्य होणार नाही.

यावर मा. सभापती यांनी सभागृहास असे निदर्शनास आणून दिले की, ब-याच वर्षानंतर असा एकत्रिकरणाचा प्रस्ताव मंडळासमोर धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी सादर करण्यात आला असून सदर प्रस्ताव मुंबई शहरातील भाडेकरु/रहिवाशांच्या हिताचा निर्णय आहे त्यामुळे दोन्ही विभागातील येणा-या प्रशासकीय अडचणी दूर होतील. सदर प्रस्ताव सादर केल्याबद्दल त्यांनी मुख्य अधिकारी व अधिकारी/कर्मचारी यांचे अभिनंदन केले व सदर प्रस्तावात मा. सदस्य श्री. बांदिवडेकर यांनी सूचविल्यानुसार फग/दक्षिण विभागाचे दोन विभागात विभाजन न करता मात्र सी१-२ व सी ३-४ या विभागात बहुसंख्य पुनर्रचित इमारती असल्यामुळे त्या दोन विभागाचे तीन विभागात विभाजन करुन मंजूर करावयास हरकत नसल्याचे सांगितले व सदर प्रस्तावामध्ये धोरणात्मक निर्णय घ्यावयाचा असल्यामुळे अधिका-यांना काही सूचना करावयाच्या असल्यास त्यांनी मुख्य अधिकारी यांच्या परवानगीने कराव्यात असे सुचविले. यावर मुख्य अधिकारी यांनी असे सांगितले की,सदर विषय दि. ६ ऑगस्ट रोजी होणा-या प्राधिकरणाच्या बैठकीत घेण्यात येणार आहे परंतु आपल्या बैठकीत निर्णय झाल्यानंतरच तो प्राधिकरणाच्या बैठकीत ठेवण्यात येईल.

सदर विषयावर चर्चेत भाग घेताना उपमुख्य अभियंता/पुनर्रचना यांनी सदर प्रस्तावातील तक्त्यामध्ये प्रत्येक विभागासमोर उपकरप्राप्त इमारतींची संख्या दाखविण्यात आलेली आहे. त्या त्या विभागातील पुनर्रचित इमारतींची संख्या देखील दाखविण्यात यावी जेणेकरुन त्या विभागातील पुनर्रचना कामाचा एकत्रित कार्यभार किती आहे याचा अंदाज येईल. सदर विषयाबाबत मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी देखील प्रस्ताव स्वागर्ताह आहे असे मत व्यक्त केले. मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी सदर प्रस्तावावर चर्चा करत असताना असे म्हटले की, पुनर्रचना विभाग बंद करणे योग्य होणार नाही. ज्या इमारतींची खाजगी विकासकांडून संयुक्तरित्या किंवा खाजगीरित्या वि.नि.नि.३३ (७) खाली पुनर्विकास होणार नाही अशा इमारतींची पुनर्बांधणी म्हाडामार्फत घ्यावयास हवी. त्याकरिता स्वतंत्र परिमंडळ असणे आवश्यक आहे.

यावर मुख्य अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, एकत्रिकरणाचा प्रस्तावात आपण म्हाडामार्फत उपकरप्राप्त इमारतींची पुनर्रचना करण्याची कामे बंद करीत नसून दुरुस्ती व पुनर्रचनेची कामे एकाच विभागाकडून पाहण्यात येतील. त्यामुळे कामात सुसूत्रता येईल. मा. सभापती यांनी मुख्य अधिकारी यांचे मताशी सहमती दर्शविली. तसे सर्व सदस्यांनी वरील प्रस्तावास सहमती दर्शविली.

चर्चेअंती सर्वानुमते प्रस्तावात फ/द, ग/द हा विभाग पूर्वीप्रमाणेच एकत्र ठेऊन सी. विभागाची तीन विभागात विभागणी सी१, सी२, सी३ अशी करुन त्याप्रमाणे प्रस्तावातील तक्त्यात बदल गृहीत धरुन खालीलप्रमाणे ठरावास मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक ११८/९७८**

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातील दुरुस्ती व पुनर्रचना विभागाचे एकत्रिकरण करण्याबाबतचा प्रस्तावात फ/द, ग/द हा विभाग पूर्वीप्रमाणेच एकत्र ठेऊन सी. विभागाची तीन विभागात विभागणी सी१, सी२, सी३ अशी करुन त्याप्रमाणे प्रस्तावातील तक्त्यात बदल करणे गृहीत धरुन प्रस्तावास एकमताने मंजूरी देण्यात आली तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता प्राधिकरणासमोर सादर करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**बाब क्रमांक : ११८/३**

विषय- इ.क्र.३१-३७, ओरीएन्टल इन्शुरन्स बिल्डींग भुकर पहाणी क्र.१२७ डॉ.व्ही.बी.गांधी मार्ग सह. गृहनिर्माण संस्थेच्या भुसंपादनाबाबतचा प्रस्ताव.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.२३ ते २५ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्ताव १०३-ब खाली भुसंपादनाचा असून रहिवाशांना न्यायालयात असलेल्या प्रकरणाबाबत माहिती दिलेली आहे असे उप अभियंता, सहकार कक्ष यांनी मा. सभापती यांनी सांगितले. सदर प्रस्ताव चर्चेअंती एकमताने मंजूर करण्यात आला.

**ठराव क्रमांक : ११८/९७९**

इ.क्र.३१-३७, ओरीएन्टल इन्शुरन्स बिल्डींग भुकर पहाणी क्र.१२७ डॉ.व्ही.बी.गांधी मार्ग सह. गृहनिर्माण संस्थेच्या भुसंपादनाबाबतचा प्रस्ताव एकमताने मंजूर करण्यात आला तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**बाब क्रमांक : ११८/४**

विषय- इ.क्र.३, चुनामलेन, "पुष्पदंत निवास" म्हाडा अधि १९७६ कलम ८८(३)अ चे प्रमाणपत्र देणे बाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.२७ ते २९ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

कार्यकारी अभियंता, डी-२ विभाग श्री. पाटील यांनी उपरोक्त प्रस्तावाबाबत सभागृहास माहिती दिली की, सदर इमारत धोकादायक असल्यामुळे दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. प्रचलीत मर्यादेपेक्षा जास्त येणारी रक्कम मालक, भाडेकरु/रहिवाशी भरण्याबाबत कळविण्यात आले होते परंतु त्यांनी रक्कम भरण्यास असमर्थता दर्शविली त्यामुळे मंडळातर्फे भाडेकरु/रहिवाशांना घरमालकास इमारत खाली करण्याबाबत नोटीस दिली असता त्यांनी नोटीस घेण्यास नकार दिला व इमारतीचे मालक न्यायालयात गेले आहेत. न्यायालयाने इमारत मालकाच्कडून प्रतिज्ञापत्र घेऊन त्यांच्या जबाबदारीवर भाडेकरु व रहिवाशांना राहण्यास परवानगी दिली आहे. सदर विषयावर चर्चा होत असताना मा.सदस्य श्री. हेमराज शहा यांनी असे सूचित केले की, जर भाडेकरु आपल्या जबाबदारीवर दुरुस्ती चालू असताना अडजस्ट करुन राहत असेल तर अधिका-यांनी त्यांना खाली करण्याकरिता जबरदस्ती करु नये. यावर मा.सदस्य श्री.बशीर पटेल यांनी असे सूचित केले की, दुरुस्ती पलिकडे इमारत घोषित केल्यानंतर जर पुनर्विकासाचा प्रस्ताव ७० टक्के संमती घेऊन सादर करीत असतील तर त्याबाबत विचार व्हावा. तसेच एकदा एखादी इमारत धोकादायक घोषित करण्यात येऊन

मंडळातर्फे नाहरकत प्रमाणपत्र दिल्यानंतर सदर विषय मंडळाकरिता संपुष्टात आणावा. तसेच एखादा विषय मंडळापुढे आणून त्यामध्ये निर्णय झाला असल्यास त्या निर्णयामध्ये बदल करण्यात येऊ नये व मंडळाने घेतलेला निर्णय कोणासही नाकारता येणार नाही जेणेकरुन मंडळाने घेतलेल्या निर्णयाचा अवमान होणार नाही. यावर मा.सभापती यांनी असे सांगितले की, मंडळाने घेतलेल्या एखाद्या निर्णयाबाबत पुन्हा शहानिशा करणे योग्य होणार नाही व मंडळाने घेतलेल्या निर्णयास ठाम राहणे योग्य होईल. चर्चेअंती सदर प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक : ११८/९८०**

इ.क्र.३, चुनामलेन, "पुष्पदंत निवास" म्हाडा अधि १९७६ कलम ८८(३)अ चे प्रमाणपत्र देणे बाबतचा प्रस्ताव एकमताने मंजूर करण्यात आला तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**बाब क्रमांक : ११८/५**

विषय- **विशेष निधी** अंतर्गत मा.आमदार श्री.भाई जगताप यांनी मुळ मंजूर कामाच्या बदल्यात प्रस्तावित केलेल्या कामांना प्रशासकीय मंजूरी देण्याबाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.३१ ते ३५ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सचिव यांनी सभागृहास अशी विनंती केली की, मा. आमदार महोदयांच्या प्रस्तावित केलेल्या कामांच्या परिशिष्ट-अ मध्ये अ.क्र.१७ वर टंकलेखित चूक झाली असून इ.क्र.१२६, डॉ.माहिमतुरा मार्ग ऐवजी इ.क्र.१२२-१२४, डॉ.माहिमतुरा मार्ग अशी सुधारणा करण्यात यावी.

चर्चेअंती विशेष निधी अंतर्गत मा. आमदार महोदयांच्या मतदारसंघात करावयाच्या कामांच्या बदलांना त्यांनी सुचविल्यानुसार परिशिष्ट-अ मध्ये दर्शविलेल्या कामांच्या अंदाजपत्रकीय रक्कमेस उपरोक्त इमारतीच्या नावाच्या सुधारणेसह) प्रशासकीय मान्यता पूर्वी दिलेल्या अटी व शर्तींवर देण्याचे तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ११८/९८१**

विशेष निधी अंतर्गत मा. आमदार महोदयांच्या मतदारसंघात करावयाच्या कामांच्या बदलांना त्यांनी सुचविल्यानुसार परिशिष्ट-अ मध्ये दर्शविलेल्या कामांच्या अंदाजपत्रकीय रक्कमेस ( इ.क्र.१२६, डॉ.माहिमतुरा मार्ग ऐवजी इ.क्र.१२२-१२४, डॉ.माहिमतुरा मार्ग अशी सुधारणा करुन ) प्रशासकीय मान्यता पूर्वी दिलेल्या अटी व शर्तींवर देण्याचे तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

---------------------------X----------------------

**बाब क्रमांक ११८/६ (दक्षिण परिमंडळ)**

विषय- दक्षिण परीमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. ३७ ते ५५ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती दक्षिण परीमंडळातील १०५ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामाच्या मुळ/सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी एकूण रक्कम रु. २०,७४,९३,९७६/- व निव्वळ टप्प्याची रक्कम रु. १०,०९,७६,०१५/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक ११८/ ९८२**

दक्षिण परीमंडळातील १०५ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामाचे नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या यादीनुसार प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

----------------------------X----------------------

**बाब क्रमांक ११८/७** ( **उत्तर परिमंडळ** )

विषय- उत्तर परीमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. ५७ ते ६९ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

मा.सदस्य श्री.बशीर पटेल यांनी असे निदर्शनास आणले की, मंडळामार्फत रु.२०००/- चौ.मी.च्या मर्यादेत इमारत दुरुस्तीची कामे केली जातात परंतु त्यांचा दर्जा चांगला नसतो तसेच काही ठिकाणी दुरुस्ती करताना कॉमन चौक बंद करण्यात आले आहेत त्यामुळे काही लोकांच्या खिडक्या बंद झाल्या आहेत. मंडळाच्या अधिका-यांना विचारले असता ते सांगतात की, याबाबत महानगरपालिकेस कळविण्यात आले आहे. अशा अनधिकृत काम करणा-या ठेकेदारांवर कारवाई होणे गरजेचे आहे. यावर मुख्य अधिकारी यांनी सूचना दिल्या की, सर्व कार्यकारी अभियंता यांनी कामाच्या दर्जाबाबत सतर्क रहावे व योग्य काम न करणा-या व अनधिकृत बांधकाम करणा-या ठेकदार व वास्तुशास्त्रांना काळया यादीत टाकण्यात यावे.

मा.सदस्य श्री. हेमराज शहा यांनी अशी सूचना केली की, डी विभागातील एका इमारतीतील सर्वच रहिवाशांना गाळे खाली करण्याच्या नोटीसा देण्यात आल्या आहेत. सर्वच रहिवाशांचे गाळे खाली न करता दुरुस्तीसाठी आवश्यक असतील तेवढेच गाळे खाली करण्यात यावेत. यावर कार्यकारी अभियंता/डी-२ विभाग यांनी अशी माहिती दिली की, जर गाळे खाली केले नाहीत तर त्या गाळयातील रहिवाशी धोकादायक भागाचा वापर करु शकतात. त्यांना तसा अटकाव करता येणे शक्य नसते व भविष्यात दुर्घटना झाल्यास त्याची जबाबदारी मंडळावर येते.

यावर मा. सभापती यांनी असे निर्देश दिले की, सदर इमारतीस ८८ (३)(अ) खाली घोषित करण्यात यावी व प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही करावी लागेल. भाडेकरुनी इमारत दुरुस्त करण्याची विनंती केली असल्यामुळे

धोकादायक भाग दुरुस्त करता येऊ शकतो किंवा कसे याबाबत कार्यकारी अभियंता यांनी पुन्हा इमारतीस भेट देऊन तसा अहवाल नस्तीवर ठेवावा.

चर्चेअंती उत्तर परीमंडळातील ६० उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु..११,४७,३६,००२ /- व निव्वळ रक्कम रु. ६,५९,०९,९६७/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**<u>ठराव क्रमांक ११८/९८३</u>**

उत्तर परीमंडळातील एकूण ६० उपकरप्राप्त इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांचे मुळ/ सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ प्रमाणे प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---------------------------X----------------------

**<u>बाब क्रमांक ११८/८</u>**

विषय- मुंबई बेटावरील अ.वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पूनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचे प्रस्ताव.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.७१ ते १२९ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सचिव यांनी उपरोक्त.१५ पुनर्विकासाच्या विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) च्या प्रस्तावांबद्दल मंडळाच्या सदस्यांना थोडक्यात माहिती दिली. अनुक्रमाक ४ मधील प्रस्तावामध्ये मंडळास सुपुर्द करावयाच्या अतिरिक्त क्षेत्रफळा मध्ये २४०.९० चो.मी. ऐवजी १९२.७२ चौ.मी. अशी सुधारणा करण्याचे सुचविले.

चर्चेअंती मंजूरीसाठी सादर करण्यात आलेल्या खालील १५ ना.ह.प्र.प्रदान करण्यांच्या प्रस्तावांना सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

१ भु.पा.क्र.२२/१०, माटुंगा विभाग, प्लॉट क्र.३६८, दादर माटुंगा इस्टेट, इ.क्र.१४ व १४अे, भांडारकर रोड माटुंगा, "**विश्रानी निवास**" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

२ भु.पा.क्र.१७३७, मांडवी विभाग, इ.क्र.१०८, शायदा मार्ग (१२५ सॅम्युअल स्ट्रिट), बी विभाग, मुंबई - ४०० ००९. येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

३. भु.पा.क्र.१४१३, मांडवी विभाग, इ.क्र.१०३, झकेरीया मस्जीद स्ट्रिट, बी विभाग, मुंबई येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

४ भुकर पहाणी क्र.७४१-१अे/१० माटुंगा विभाग, इ.क्र.१७, आर.पी.मसानी रोड, माटुंगा, मुंबई १९ **'कुमकुम बिल्डिंग'.** म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

५ भुकर पहाणी क्र.७५ व ७६ लोअर परेल विभाग, इ.क्र.३२२-सी व ३२२-डी, ना.म.जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई - १३ **'कल्याण भवन'.** म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

६ अंतिम भुखंड क्र.६४७-टी.पी.एस.३-माहिम विभाग, इ.क्र.७१-बी, माहिम बाजार क्रॉस रोड व शीतलादेवी टेम्पल रोड, माहिम, मुंबई १६, **'दामोदर वाडी'.** म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

७ अंतिम भुखंड क्र.१०२१-टी.पी.एस.४-माहिम विभाग, इ.क्र.३-३बी, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर (प) मुंबई-२५ **'मोती चाळ'.** म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

८ अंतिम भुखंड क्र.१०२०-टी.पी.एस.४-माहिम विभाग, इ.क्र.५-५अे-७, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर (प) मुंबई-२५ **'शिवशंकर भवन'.**मुंबई येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

९ भुकर पहाणी क्र.७५८ - दादर नायगाव विभाग, इ. क्र.१५४, जेरबाई वाडीया रोड, परळ, मुंबई-१२ **'चोणकर बिल्डिंग व नानुमल निवास'** म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

१० भुकर पहाणी क्र.१४९७, अंतिम भुखंड क्र.२८३, टी.पी.एस.-४-माहिम विभाग, इ.क्र.१०३-अे, एस.के.बोले मार्ग, दादर(प), मुंबई -२८ **'न्यु कात्रक बिल्डिंग'.**म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

११ भुकर पहाणी क्र.८१८-लोअर परेल विभाग, इमारत क्र.९-एफ, पांडुरंग बुधकर मार्ग, लोअर परेल, मुंबई-१३ **'एकता प्रसाद को-ऑ.गृ.संस्था मर्यादीत'.**म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

१२ भुकर पहाणी क्र.२/१, २अे/१ व २बी/१ वरळी विभाग, - इ.क्र.५-अे-बी,डॉ.ॲनी बेसन्ट रोड, वरळी, मुंबई-१८ **'मामा हाजीअनी दर्गा'.**म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

१३ भुकर पहाणी क्र.१२४८, भायखळा विभाग, इ.क्र.३२-३४-३६, टेमकर स्ट्रिट, मुंबई-०८ **'मारवाडी बिल्डिंग'** म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

१४ भुकर पहाणी क्र.१९२५, भायखळा विभाग, इ.क्र.८०२-८०६ व ८०४अे, बी.जे.मार्ग, भायखळा, मुंबई **'सौदागर बिल्डिंग'.**म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

१५ भुकर पहाणी क्र.१५९७ व १६०६, मांडवी विभाग, इ.क्र.१९-२५-२५अे व २५बी, **निशानपाडा क्रॉसलेन,** .म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

<u>ठराव क्रमांक : ११८/९८४</u>

मुंबई बेटावरील खालील १५ मालमत्तांवरील 'अ' वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रस्ताव प्रस्तावांत नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या आधीन राहून ना हरकत प्रमाणपत्रं प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी.

१ भु.पा.क्र.२२/१०, माटुंगा विभाग, प्लॉट क्र.३६८, दादर माटुंगा इस्टेट, इ.क्र.१४ व १४अे, भांडारकर रोड माटुंगा, **"विश्रानी निवास"**

२ भु.पा.क्र.१७३७, मांडवी विभाग, इ.क्र.१०८, शायदा मार्ग (१२५ सॅम्युअल स्ट्रिट), बी विभाग, मुंबई - ४०० ००९.

३ भु.पा.क्र.१४१३, मांडवी विभाग, इ.क्र.१०३, झकेरीया मस्जीद स्ट्रिट, बी विभाग मुंबई.

४ भुकर पहाणी क्र.७४१-१अे/१० माटुंगा विभाग, इ.क्र.१७, आर.पी.मसानी रोड, माटुंगा, मुंबई १९ **'कुमकुम बिल्डिंग'.**

५ भुकर पहाणी क्र.७५ व ७६ लोअर परेल विभाग, इ.क्र.३२२-सी व ३२२-डी, ना.म.जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई - १३ **'कल्याण भवन'.**

६ अंतिम भुखंड क्र.६४७-टी.पी.एस.३-माहिम विभाग, इ.क्र.७१-बी, माहिम बाजार क्रॉस रोड व शीतलादेवी टेम्पल रोड, माहिम, मुंबई १६, **'दामोदर वाडी'.**

७ अंतिम भुखंड क्र.१०२१-टी.पी.एस.४-माहिम विभाग, इ.क्र.३-३बी, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर (प) मुंबई-२५ **'मोती चाळ'.**

८ अंतिम भुखंड क्र.१०२०-टी.पी.एस.४-माहिम विभाग, इ.क्र.५-५अे-७, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर (प) मुंबई-२५ **'शिवशंकर भवन'.**

९ भुकर पहाणी क्र.७५८ - दादर नायगाव विभाग, इ. क्र.१५४, जेरबाई वाडीया रोड, परळ, मुंबई-१२ **'चोणकर बिल्डिंग व नानुमल निवास'.**

१० भुकर पहाणी क्र.१४९७, अंतिम भुखंड क्र.२८३, टी.पी.एस.-४-माहिम विभाग, इ.क्र.१०३-अे, एस.के.बोले मार्ग, दादर(प), मुंबई -२८ **'न्यु कात्रक बिल्डिंग'.**

११ भुकर पहाणी क्र.८१८-लोअर परेल विभाग, इमारत क्र.९-एफ, पांडुरंग बुथकर मार्ग, लोअर परेल, मुंबई-१३ **'एकता प्रसाद को-ऑ.गृ.संस्था मर्यादीत'**

१२ भुकर पहाणी क्र.२/१, २अे/१ व २बी/१ वरळी विभाग, - इ.क्र.५-अे-बी,डॉ.ॲनी बेसन्ट रोड, वरळी, मुंबई-१८ **'मामा हाजीअनी दर्गा'.**

१३ भुकर पहाणी क्र.१२४८, भायखळा विभाग, इ.क्र.३२-३४-३६, टेमकर स्ट्रिट, मुंबई-०८ **'मारवाडी बिल्डिंग'.**

१४ भुकर पहाणी क्र.१९२५, भायखळा विभाग, इ.क्र.८०२-८०६ व ८०४अे, बी.जे.मार्ग, भायखळा, मुंबई **'सौदागर बिल्डिंग'.**

१५ भुकर पहाणी क्र.१५९७ व १६०६, मांडवी विभाग, इ.क्र.१९-२५-२५अे व २५बी, **निशानपाडा क्रॉसलेन,** मुंबई.

---------------------------X---------------------

**बाब क्रमांक ११८/९**

विषय- **विशेष निधी** मा.आमदार श्री. सचिन अहिर यांच्या शिवडी-वरळी मतदारसंघात करावयाच्या कामातील बदलांना प्रशासकिय मान्यता देणेबाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.१३१ ते १३२ वर प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहेत.

मा.सभापती यांनी मुख्य अधिकारी यांना सदर बाबतीत माहिती देण्याची सूचना केली. त्यानुसार मुख्य अधिकारी यांनी सभागृहास असे सांगितले की, मा. आमदार महोदयांना त्यांच्या विभागात काम करण्यासाठी विशेष निधी रु.९० कोटी अपेक्षित आहेत. एम.एम.आर.डी.ने उपलब्ध करुन दिलेला रु.२०० कोटीचा निधी हा मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ यांच्याकरिताच दिलेला असून मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळातर्फे काही निधी इमारत दुरुस्तीच्या कामाकरिता वापरण्याबाबत अनुमती देण्याकरिता प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे. त्यास मंजूरी मिळाल्यास त्यातून काही निधी मिळेल व रु.९० कोटीचा प्रस्ताव अद्याप मंजूर झालेला नाही. तोही मंजूर झाल्यास मा. आमदारांना विशेष निधी मिळेल.त्यामुळे आमदार महोदयांनी प्रस्तावित केलेल्या कामांना सद्यस्थितीत प्रशासकीय मान्यता देता येत नाही.

सदर बाबतीत मा. सभापती यांनी अशी सूचना केली की, ते स्वतः व मा. आमदार श्री. बशीर पँटेल हे याबाबत शासन स्तरावर पाठपुरावा करतील.

चर्चेअंती विशेष निधी अंतर्गत मा. आमदार महोदयांच्या मतदारसंघात करावयाच्या कामांच्या बदलांना त्यांनी सुचविल्यानुसार परिशिष्ट-अ मध्ये दर्शविलेल्या कामांच्या अंदाजपत्रकीय रक्कमेस ) प्रशासकीय मान्यता पूर्वी दिलेल्या अटी व शर्तीवर देण्याचे तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे सर्वानुमते ठरले.

<u>ठराव क्रमांक : ११८/९८५</u>

विशेष निधी अंतर्गत मा. आमदार महोदयांच्या मतदारसंघात करावयाच्या कामांच्या बदलांना त्यांनी सुचविल्यानुसार परिशिष्ट-अ मध्ये दर्शविलेल्या कामांच्या अंदाजपत्रकीय रक्कमेस ) प्रशासकीय मान्यता पूर्वी दिलेल्या अटी व शर्तीवर देण्याचे तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

-----------------------------x-----------------------

<u>बाब क्रमांक ११८/१०</u>

**विषय-** <u>म्हाडा अधि १९७६ कलम ८८(३)अ चे प्रमाणपत्र देणे बाबत.</u>
१ ) इ.क्र. १५४-१५६, डॉ.बाबासाहेब जयकर मार्ग, (परशुराम बिल्डिंग) गिरगाव, मुंबई - ०४
२) इ.क्र. ३६-एम., मुगभाट क्रॉसलेन, (भिवंडकर हाऊस) गिरगाव, मुंबई - ०४.

-----------------------------------------------------

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. १३३ ते १३९ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

इ.क्र. १५४-१५६, डॉ.बाबासाहेब जयकर मार्ग, (परशुराम बिल्डिंग) गिरगाव, मुंबई - ०४ या इमारतीस म्हाड अधि १९७६ कलम ८८ (३) अ चे प्रमाणपत्र देण्याबाबतच्या प्रस्तावाची माहिती कार्यकारी अभियंता, डी-१ विभाग यांनी सभागृहास दिली. सदर प्रस्तावावर चर्चा होऊन म्हाड अधि १९७६ कलम ८८ (३) अ चे प्रमाणपत्र देण्याचे सर्वानुमते ठरले.

इ.क्र. ३६-एम., मुगभाट क्रॉसलेन, (भिवंडकर हाऊस) गिरगाव, मुंबई - ०४ या इमारतीस म्हाड अधि १९७६ कलम ८८ (३) अ चे प्रमाणपत्र देण्याबाबतच्या प्रस्तावाची माहिती कार्यकारी अभियंता, डी-१ विभाग यांनी सभागृहास दिली व इमारतीच्या भाडेकरुंनी ५ दिवस आधी इमारतीच्या दुरुस्तीकरिता लागणारी अतिरिक्त रक्कम आमदार निधीतून उपलब्ध केल्याचे कळविले आहे अशी माहिती दिली. त्यामुळे सदर प्रस्ताव सद्यस्थितीत प्रलंबित ठेवण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली. .

<u>ठराव क्रमांक : ११८/९८६</u>

इ.क्र. १५४-१५६, डॉ.बाबासाहेब जयकर मार्ग, (परशुराम बिल्डिंग) गिरगाव, मुंबई - ०४ या इमारतीस म्हाड अधि १९७६ कलम ८८ (३) अ चे प्रमाणपत्र देण्यास सर्वानुमते मंजूरी दिली तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली. व इ.क्र. ३६-एम., मुगभाट क्रॉसलेन, (भिवंडकर हाऊस) गिरगाव, मुंबई - ०४. या इमारतीस म्हाड अधि १९७६ कलम ८८ (३) अ चे प्रमाणपत्र देण्याचा प्रस्ताव प्रलंबित ठेवण्याचे एकमताने ठरले.

-----------------------------x-----------------------

**बाब क्रमांक ११८/११**

विषय- दक्षिण परिमंडळातील प्रगतीपथावर असलेल्या दुरुस्ती कामांना रु.२०००/- चौ.मी. ही मर्यादा लागू करण्याबाबत.

---

१) इ.क्र.९६-१०६, जे.बी.शहा मार्ग.
२) इ.क्र.४, लेबर्नम रोड.
३) इ.क्र.१४८, वाळकेश्वर रोड.
४) इ.क्र.९०, कॅव्हल क्रॉस लेन, नं-२.
५) इ.क्र.७१, खांबेकर स्ट्रिट.
६) इ.क्र.६५३अे, जे.एस.एस.रोड.
७) इ.क्र.७, असेंब्ली लेन.

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.१४१ ते १५५ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती उपरोक्त प्रस्तावांना रु.२०००/- प्रति चौ.मी.प्रचलित दुरुस्ती मर्यादा लागू करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक : ११८/९८७**

खालील प्रस्तावांना रु.२०००/- प्रति चौ.मी.प्रचलित दुरुस्ती मर्यादा लागू करण्यास सर्वानुमते ठरले तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही कराण्यास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले..

१) इ.क्र.९६-१०६, जे.बी.शहा मार्ग.
२) इ.क्र.४, लेबर्नम रोड.
३) इ.क्र.१४८, वाळकेश्वर रोड.
४) इ.क्र.९०, कॅव्हल क्रॉस लेन, नं-२.
५) इ.क्र.७१, खांबेकर स्ट्रिट.
६) इ.क्र.६५३अे, जे.एस.एस.रोड.
७) इ.क्र.७, असेंब्ली लेन.

---

**आयत्यावेळचे विषय**

**बाब क्रमांक ११८/१२**

विषय- संक्रमण शिबीरात ५ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेल्या भाडेकरु/ रहिवाशांचे बृहतसूचीवर समावेश करण्याबाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.१५७ ते १६३ वर मंजूरीकरिता सादर करण्यात आला आहे.

उपरोक्त प्रस्तावावर चर्चा होऊन सदर प्रस्ताव प्राधिकरणाच्या मान्यतेकरिता सादर करण्यास एकमताने मंजूरी देण्याचे ठरले.

<u>ठराव क्रमांक : ११८/९८८</u>

संक्रमण शिबीरात ५ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेल्या भाडेकरु/रहिवाशांचे बृहतसूचीवर समावेश करण्याबाबत प्रस्ताव प्राधिकरणास मान्यतेकरिता सादर करण्यास एकमताने मंजूरी दिली तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही कराण्यास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले..

<u>बाब क्रमांक ११८/१३</u>

विषय- पुनर्रचित इमारतीमधील गाळयांचे हस्तांतरणावरील निर्बंधात सुधारणा करणेबाबत.

--------------------------------------------

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. १६५ ते १६७ वर मंजूरीकरिता सादर करण्यात आला आहे.

उपरोक्त प्रस्तावावर चर्चा होऊन पुनर्रचित इमारतीमधील गाळयांचे हस्तांतरणावरील निर्बंधात सुधारणा करणेबाबतचा प्रस्ताव प्राधिकरणाच्या व शासनाच्या मान्यतेकरिता सादर करण्यास एकमताने मंजूरी देण्याचे ठरले.

<u>ठराव क्रमांक : ११८/९८९</u>

पुनर्रचित इमारतीमधील गाळयांचे हस्तांतरणावरील निर्बंधात सुधारणा करण्याबाबतचा प्रस्ताव प्राधिकरणास व शासनास मान्यतेकरिता सादर करण्यास एकमताने मंजूरी दिली तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही कराण्यास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

<u>बाब क्रमांक ११८/१४</u>

विषय- **<u>विशेष निधी</u>**
मा.आमदार श्री. बशीर पटेल यांच्या उमरखाडी मतदारसंघात करावयाच्या कामातील बदलांना प्रशासकिय मान्यता देणेबाबत.

----------------------------------------

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. १६९ ते १७१ वर प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती विशेष निधी अंतर्गत मा. आमदार महोदयांच्या मतदारसंघात करावयाच्या कामांच्या बदलांना त्यांनी सुचविल्यानुसार परिशिष्ट-अ मध्ये दर्शविलेल्या कामांच्या अंदाजपत्रकीय रक्कमेस ) प्रशासकीय मान्यता पूर्वी दिलेल्या अटी व शर्तीवर देण्याचे तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे सर्वानुमते ठरले.

<u>ठराव क्रमांक : ११८/९८</u>

विशेष निधी अंतर्गत मा. आमदार महोदयांच्या मतदारसंघात करावयाच्या कामांच्या बदलांना त्यांनी सुचविल्यानुसार परिशिष्ट-अ मध्ये दर्शविलेल्या कामांच्या अंदाजपत्रकीय

रक्कमेस ) प्रशासकीय मान्यता पूर्वी दिलेल्या अटी व शर्तींवर देण्याचे तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

बैठकीच्या अखेरीस मा. सभापती यांनी सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर केले.

सचिव तथा नि.का.अ./मुं.इ.दु.व पु.मंडळ

मा.मुख्य अधिकारी/मुं.इ.दु.व पु.मंडळ

मा. सभापती / मुं.इ.दु.व पु.मंडळ